

# यशोगाथा
# गांडूळ खत निर्मीती उदयोग

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **श्री. निलेश टाके** |
| पत्ता | : | मो. पो. टिळकवाडी, महेश भवन समोर,यवतमाळ जी. यवतमाळ |
| संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक | : | |
| वय | : | ४४ वर्ष |
| शिक्षण | : | १० वी स्थापत्य अभियांत्रीकी पदविका |
| जमीन धारकता | : | ११.०० एकर |
| जनावरांची संख्या | : | गाई ०२, म्हशी ०८ |
| आधार क्र | : | ७१२५३९६३२३६२ |

## पार्श्वभुमी

**श्री. निलेश टाके** हे स्थापत्य अभियांत्रीकी पदविका धारक असून सन २०१८ पासून ०२ बेड पासून सुरूवात केली. त्याकरीता खालील प्रमाणे खर्च केला.

| विवरण | खर्च |
|---|---|
| बेड ०२ नग X १६०० मुल्य | ३२००.०० |
| गांडूळ कल्चर ५ किलो | १०००.०० |
| एकुण | ४२००.०० |

यापासून ०४ टन खत वार्षीक मिळाले व मिळालेल्या खताचे मी ०१ एकर शेतीचे नियोजन केले त्यावर्षी सोयाबिन व तूर पिकाची वाढ चांगली होवून त्यावरील खताचा खर्च व तणाचा कमी प्रादुर्भाव आढळून आला व पिकाचे उत्पन्न सारखे आले त्यावर्षी ०४ टन हा बाजार भावाप्रमाणे १० रू, किलो प्रमाणे ४०००० रू खर्च वाचला आणि गांडूळ कल्चर १० ते १५ किलो गांडूळ खत निर्मीती करीता मिळाले. यापासून पिकाचा खर्चामध्ये ६० टक्के बचत झाली त्यामुळे माझा मानस हा गांडूळ खत निर्मीती करण्याचा झाला. नंतर कोरोना काळ संपल्यानंतर १० बेड ची सुरूवात केली व त्यासाठी मी खालील प्रमाणे खर्च केला.

| विवरण | खर्च |
|---|---|
| बेड १० नग X १६०० मुल्य | १६०००.०० |
| गांडूळ कल्चर | = ०० |
| एकुण | १६००० |

उपरोक्त प्रकल्प सुरू करण्यासाठी मला निवळ बेडचा खर्च झाला व गांडूळ कल्चर हे मला माझ्या सुरूवातीच्या ०२ बेड पासून जवळपास ०५ किलो पासून ४० किलो गांडूळ कल्चर दोन वर्षात मिळाले.

१० बेड पासून मला वर्षाकाठी २५ टन गांडूळ खताचे उत्पादन मिळाले तसेच गांडुळ कल्चर १६० किलो तयार झाले. मिळालेल्या २५ टन गांडूळ खताचे मी माझ्या ०५ एकर शेतीमध्ये १५ टनाचा वापर केला त्यामुळे माझे रासायनिक खताचा खर्च वाचला.

उर्वरित गांडूळ खत हा बाजारभाव रू ०८ किलो दराप्रमाणे ८००० रू मिळाले त्यामध्ये मजुर खर्च व इतर खर्च वगळता मला ५० ते ५५ हजार रू मिळाले. हे लक्षात घेवून काही तांत्रीक अडचणी येत असल्यामुळे मी कृषि विज्ञान केंद्र यवतमाळ यांच्या संपर्कात येऊन मला साहस व उदयोग निर्मीतीला प्रोत्साहन दिले.

सन २०२२ मध्ये मी पुर्ण ४० बेड ची सुरूवात जोमाने केली त्यासाठी मला

| **विवरण** | **खर्च** |
|---|---|
| बेड ४० नग X १६०० मुल्य | ६४०००.०० |
| गांडूळ कल्चर | ००.०० |
| **एकुण** | **६४०००.००** |

एकुण ६४,००० रू गुतवणुक करून त्यापासून वर्षाकाठी १०० ते १२० टन खताची निर्मीती केली त्यामध्ये विक्री ६० ते ६५ टन करण्यात आला त्यासाठी भाव ८००० रू टन प्रमाणे मिळाला गांडूळ कल्चर २५० ते ३०० किलो मिळाले दर ३०० रू किलो प्रमाणे ७५,००० ते ९०,००० रू विक्री करण्यात आली.

त्यापासून एकुण ५,५५,००० ते ६,१०,००० रू उत्पन्न मिळाले यामध्ये शेणखत खरेदी करीता व मजुरी इतर किरकोड खर्च वजा करता मला वर्षाकाठी ३,००,००० ते ३,५०,००० रू निवळ नफा मिळाला.

**कृषि विज्ञान केंद्राचे तांत्रीक सहाय्य व मार्गदर्शन**

- शास्त्रीय पध्दतीने गांडूळ खत निर्मीती
- जिल्हास्तरीय शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य




Photo




Vermicopost




Member of Farmer Scientist Forum

| |
|---|
|  |
| Photo |
|  |
| Photo |
|  |
| Certificate |

Certificate text (image 3):

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ
वाघापूर रोड, यवतमाळ -४४५००१

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येत आहे की, मा. डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या संकल्पनेतून कृषि विज्ञान केंद्रं, यवतमाळ अंतर्गत जिल्हयातील प्रयोगशील / नाविण्यपूर्ण उपक्रम करत असलेले शेतकरी बांधवांचा शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन करण्यात आला असून *श्री निलेश टाके, मु. पो. टिळकवाडी, महेश भवन समोर, यवतमाळ जिल्हा यवतमाळ* यांची शेतकरी शास्त्रज्ञ मंचामध्ये *सदस्य* म्हणून निवड करण्यात आली आहे.

*दिनांक: ०६/०२/२०२३*
*जा.क/कृविके/आस्था/शेशामं/७६७ /२०२३*

*वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख*
*कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ*